सामना 12/03/2020



# शिक्षण हाच देशाचा खरा ऑक्सिजन !

पुणे, दि. ११ (प्रतिनिधी)- ज्ञान हे माणसाला आनंदी, सशक्त बनवते, ही शिकवण आश्रमांमध्ये दिली जात होती. तप, साधना आणि उत्तम नागरिक घडविण्याचे ठिकाण म्हणजे आश्रम. गरिबी, आजार यांसह अनेक समस्या आज देशासमोर आहेत. भारताला खऱ्या अर्थाने विकसित देश करायचे असेल, तर शिक्षण हाच देशाचा ऑक्सिजन आहे. शिक्षणासोबतच उत्तम आरोग्य सुविधा हेदेखील असणे गरजेचे आहे, असे मत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ पद्मभूषण डॉ. शां. ब. मुजूमदार यांनी व्यक्त केले.

विश्व जागृती मिशन ट्रस्टतर्फे पुण्यधाम आश्रम दिनानिमित्त कात्रज-कोंढवा रस्त्यावरील पुण्यधाम आश्रमामध्ये पुण्यधाम ह्युमॅनिटरियन सर्व्हिस पुरस्कार मुकुल माधव फाउंडेशनच्या कार्यकारी विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांना देण्यात आला. यावेळी पद्मविभूषण डॉ. विजय भटकर, विश्व जागृती मिशन ट्रस्टच्या माताजी कृष्णा कश्यप, संस्थेचे अध्यक्ष सदानंद शेट्टी, घनश्याम झंवर आदी उपस्थित होते. पुण्यधाम ह्युमॅनिटरियन सर्व्हिस पुरस्कार मुकुल माधव फाउंडेशनच्या कार्यकारी विश्वस्त रितू प्रकाश छाब्रिया यांना प्रदान करण्यात आला.

रितू छाब्रिया म्हणाल्या, कोणताही पुरस्कार म्हणजे एक जबाबदारी असते. माझ्यावरदेखील या पुरस्काराने आणखी एक जबाबदारी वाढली आहे. सामाजिक क्षेत्रात काम करताना आरोग्य, शिक्षणासोबत समाजातील गरजूंना मदतीचा हात देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

धीरेन नंदू, मीना नंदू, द्वारकादास माहेश्वरी, वनिता दासवानी, रावसाहेब सूर्यवंशी यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी दीपक पायगुडे, विनोद कपूर, शशिकांत पागे, घनश्याम झंवर, पंकज धेडीया व गणेश कामठे उपस्थित होते. माताजी कृष्णा कश्यप, सदानंद शेट्टी यांची यावेळी भाषणे झाली. रमेश ग्रोव्हर आणि अमिता बैंदूर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. घनश्याम झंवर यांनी आभार मानले.